
डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी , नागपूर

थेरी संघमित्ता दिवस अहवाल

आयोजक : पाली विभाग

**सत्र २०२४-२०२५**

**THERI SANGHAMITRA DAY CELEBRATION: 14-12-2024**
**DEPARTMENT OF PALI**
**SESSION: 2024-25**



**डॉ. आंबेडकर महाविद्यालय**

दीक्षाभूमी, नागपूर

**पाली भाषा विभाग**

सूचना

पाली भाषा विभागा द्वारे **शनिवार**, दिनांक **१४ डिसेंबर २०२४** ला, **सकाळी ११ वाजता थेरी संघमित्ता दिवसाचे** आयोजन करण्यात आलेले आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने महाविद्यालयाच्या प्रांगणापासून तर बोधिवृक्ष परीसर, दीक्षाभूमी पर्यंत रॅली काढण्यात येणार आहे. करिता सर्वांनी पांढरे वस्त्र परिधान करून या कार्यक्रमात सहभागी व्हावे. आपली उपस्थिती अनिवार्य आहे.

प्राचार्या

डॉ. बी. ए. मेहेरे मॅड

PRINCIPAL
DR. AMBEDKAR COLL
NAGPUR

पाली विभाग, डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी, नागपूर द्वारे **थेरी संघमित्ता दिवस** बोधिवृक्ष परिसर, दीक्षाभूमी येथे दिनांक : १४/१२/२०२४ ला सकाळी ११ वाजता साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. बी. मेहेरे, प्राचार्या, डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी, नागपूर होते. या कार्यक्रमाचे संयोजन प्रा. डॉ. निलीमा गजभिये आणि प्रा. विधिशा ढोके यांनी केले.

मार्गशीर्ष पौर्णिमेला थेरी संघमित्ता या अकरा थेरी समवेत बोधीवृक्षाची शाखा घेऊन श्रीलंकेमध्ये आगमनीत झाल्या होत्या आणि याच दिवशी बोधीवृक्षाचे रोपण श्रीलंकेतील अनुराधापुर येथे करण्यात आले होते. त्याचप्रकारे याच दिवशी थेरी संघमित्ता यांनी श्रीलंकेमध्ये भिक्खुणी संघाची स्थापना केली. थेरी संघमित्ता या इतिहासातील प्रथम महिला होत्या ज्यांनी भारताच्या बाहेर बौद्ध धम्माचा प्रचार-प्रसार केला. थेरी संघमित्ताचे योगदान लक्षात घेता थेरी संघमित्ता दिवस महाविद्यालयात साजरा करण्यात आला.

याप्रसंगी महाविद्यालयातून बोधीवृक्षाच्या रोपा सोबत थेरी संघमित्ता यांची प्रतिमा घेऊन महाविद्यालय ते दीक्षाभूमी येथील बोधीवृक्षा पर्यंत रॅली काढण्यात आली. या रॅलीची सांगता बोधिवृक्ष परिसर, दीक्षाभूमी येथे झाली. कार्यक्रमाच्या प्रारंभी भन्ते राहुल यांनी त्रिशरण आणि पंचशील दिले. यानंतर बोधीवृक्षाला जलार्पण करण्यात येऊन बोधिवंदना घेण्यात आली. अध्यक्षीय वक्तव्य डॉ. बी. मेहेरे, प्राचार्या, डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी यांनी

केले. प्राचार्या, डॉ. बी. मेहेरे यांनी सेमिनार हॉल ला थेरी संघमित्ता यांचे नाव देण्याची घोषणा आपल्या वक्तव्यात केली.  भन्ते राहुल यांनी याप्रसंगी बौद्धधम्मात स्त्रियांचे योगदान याविषयावर वक्त्यव्य केले. त्याचप्रकारे  प्रा.डॉ. सुभाष सोमकुंवर , पाली ची विद्यार्थिनी अल्का गवई यांनी थेरी संघमित्ता यांचे बौद्धधम्माला दिलेले योगदान स्पष्ट केले. याप्रसंगी प्रा. डॉ. निलीमा गजभिये  'थेरी संघमित्ता दिवसाचे महत्व' समजावून सांगितले. कार्यक्रमाचे संचालन पाली ची  विद्यार्थीनी  लता मुलताईकर  आणि आभार प्रदर्शन प्रा. विधिशा ढोके यांनी केले. कार्यक्रमाची सांगता खीर दानाद्वारे करण्यात आली.  यावेळी भिक्खुसंघ, डॉ. विद्या चौरपगार,  प्रा.डॉ. दीपा पान्हेकर,  डॉ.  वर्षा पाणबूडे, पाली विभागातील  रितू शेंडे,  सुनीता वऱ्हाडे, दीपा थूलकर, भाग्यश्री लोखंडे व महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.






On 14th December 2024, Dr. Ambedkar College, Nagpur, celebrated Theri Sanghamitra Day with great enthusiasm. It was organized by Department of Pali Prakrit. The event honored the life and contributions of Theri Sanghamitra, the daughter of Emperor Ashoka and a pivotal figure in spreading Buddhism to Sri Lanka. The program commenced with a floral tribute, followed by enlightening speeches highlighting her dedication to peace and spiritual upliftment. Students presented a skit and cultural performances depicting her journey and teachings. The principal emphasized the relevance of her values in today's world. The celebration concluded with a pledge to uphold Theri Sanghamitra's legacy, inspiring everyone to follow the path of compassion and wisdom. Faculty members and students attended the programme in large numbers.



## दीक्षाभूमीवर थेरी संघमित्ता दिन साजरा

नागपूर : दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या पाली-प्राकृत विभागातर्फे थेरी संघमित्ता दिन साजरा करण्यात आला. मार्गशीर्ष पौर्णिमेला थेरी संघमित्ता या अकरा थेरी समवेत बोधीवृक्षाची शाखा घेऊन श्रीलंकेमध्ये आगमनीत झाल्या होत्या आणि याच दिवशी बोधीवृक्षाचे रोपण श्रीलंकेतील अनुराधापूर येथे करण्यात आले होते. त्याचप्रकारे याच दिवशी थेरी संघमित्ता यांनी श्रीलंकेमध्ये भिक्खुणी संघाची स्थापना केली. थेरी संघमित्ता या इतिहासातील प्रथम महिला होत्या ज्यांनी भारताच्या बाहेर बौद्ध धम्माचा प्रचार-प्रसार केला. थेरी संघमित्ताचे योगदान लक्षात घेता थेरी संघमित्ता दिवस महाविद्यालयात साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयातून बोधीवृक्षाचे रोपटे सोबत थेरी संघमित्ता यांची प्रतिमा घेऊन दीक्षाभूमीतील बोधीवृक्षापर्यंत रॅली काढण्यात आली. यावेळी भिक्खुसंघ, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. बी. ए. मेहेरे, डॉ. नीलिमा गजभिये, प्रा. विदिशा ढोके, डॉ. विद्या चौरपगार, डॉ. दीपा पान्हेकर, डॉ. वर्षा पाणबुडे, पाली विभागातील गौतमी कांबळे, अलका गवई, रितू शेंडे, सुनीता वऱ्हाडे, दीपा थूलकर, भाग्यश्री लोखंडे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

## थेरी संघमित्ता दिवस थाटात

### डॉ. आंबेडकर महाविद्यालयाचा उपक्रम



नागपूर. डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी येथील पाली-प्राकृत विभागातर्फे थेरी संघमित्ता दिवस साजरा करण्यात आला. थेरी संघमित्ता या इतिहासातील प्रथम महिला होत्या ज्यांनी भारताच्या बाहेर बौद्ध धम्माचा प्रचार-प्रसार केला. थेरी संघमित्ताचे योगदान लक्षात घेता थेरी संघमित्ता दिवस महाविद्यालयात साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयातून बोधीवृक्षाचे रोपटे सोबत थेरी संघमित्ता यांची प्रतिमा घेऊन महाविद्यालय ते दीक्षाभूमी येथील बोधीवृक्षा पर्यंत रॅली काढण्यात आली. यावेळी भिक्खुसंघ, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. बी. ए. मेहेरे, डॉ. निलीमा गजभिये, प्रा. विधिशा ढोके, डॉ. विद्या चौरपगार, डॉ. दीपा पान्हेकर, डॉ. वर्षा पाणबूडे, पाली विभागातील गौतमी कांबळे, अल्का गवई, रितू शेंडे, सुनीता व हाडे, दीपा थूलकर, भाग्यश्री लोखंडे व महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.